# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

## व्यवस्थापन परिषदेच्या १९५ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत

## शुक्रवार, दि. ०४ एप्रिल, २०२५ रोजी सकाळी १०: ३० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १९५ वी तातडीची बैठक **शुक्रवार, दि.०४ एप्रिल, २०२५ रोजी सकाळी १०:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| १८) | डॉ. अशोक उबाळे<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | ऑनलाईन उपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | विनंतीनुसार अनुपस्थिती |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे व श्री. महादेव धरेप्पा कमळे यांनी आपली अनुपस्थिती दूरध्वनीद्वारे कळविली होती व सीए महादेव सोमशंकर खराडे, वित्त व लेखा अधिकारी हे विद्यापीठाच्या कामानिमित्त पुणे येथे गेलेले असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | दि.२७ मार्च, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि.२७ मार्च, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९४ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | विषय क्र. ०२ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | संलग्नता विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | दि.०४/०३/२०२५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. ५ नुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्तारासाठी संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दरवर्षीप्रमाणे ०१ एप्रिल किंवा त्यापूर्वी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११५ व १०९ (४) (ग) मधील तरतूदीन्वये शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन, पारंपारिक अभ्यासक्रमाचे प्रस्ताव राज्य शासनाकडे व व्यवसायिक अभ्यासक्रमाचे प्रस्ताव शिखर संस्था व राज्य शासनाकडे, AICTE च्या मान्यतेच्या अधीन राहून, राज्य शासनास पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | दि.०४/०३/२०२५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. ५ नुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्तारासाठी संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दरवर्षीप्रमाणे ०१ एप्रिल किंवा त्यापूर्वी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११५ व १०९ (४) (ग) मधील तरतूदीन्वये शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन, पारंपारिक अभ्यासक्रमाचे प्रस्ताव राज्य शासनाकडे व व्यवसायिक अभ्यासक्रमाचे प्रस्ताव शिखर संस्था व राज्य शासनाकडे, AICTE च्या मान्यतेच्या अधीन राहून, तसेच ज्या महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेशित विद्यार्थी संख्या ०० आहे अशा महाविद्यालयांचे प्रस्ताव वगळून राज्य शासनास पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | **ऑक्टो/नोव्हें २०२४ च्या परिक्षेमध्ये गोपनीय प्रेसच्या माध्यमातून प्रश्नपत्रिकांमध्ये झालेल्या चुकांच्या अनुषंगाने विद्यार्थी संघटना, महाविद्यालयाचे प्राचार्य, अधिसभा सदस्य व इतर विविध संघटना यांच्या प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदय यांनी नामनिर्देशित नियुक्त उच्चस्तरीय समितीचा प्राप्त अहवाल विचारार्थ.**<br>टिपणी: याबाबत सादर करण्यात येते की, ऑक्टो/नोव्हें २०२४ च्या परीक्षेतील DTP-Typesetting and E-Secured delivery Question Papers च्या कामाबाबत गोपनिय फर्मच्या संदर्भात प्राप्त झालेल्या विविध तक्रारीच्या अनुषंगाने या कार्यालयाने सादर केलेल्या दिनांक २३/०१/२०२५ रोजीच्या टिपणीवरील मा. कुलगुरु महोदय यांच्या आदेशान्वये दिनांक १२/०२/२०२५ रोजीच्या टिपणीवरील नामनिर्देशित उच्चस्तरीय समितीने सर्व प्राप्त तक्रारी तक्रारीच्या अनुषंगाने उपलब्ध प्रश्नपत्रिका व त्यानुषंगीक कागदपत्रांच्या अनुषंगाने दिनांक २१/०२/२०२५, ०५/०३/२०२५, १३/०३/२०२५ व दिनांक २१/०३/२०२५ रोजी प्रमाणे चार बैठका घेण्यात आले. त्यानुषंगाने विभागाकडे प्राप्त तक्रारी, उपलब्ध प्रश्नपत्रिका व त्यानुषंगीक कागदपत्रांच्या अनुषंगाने सदर उच्चस्तरीय समितीने खालीलप्रमाणे अहवाल व शिफारशी नोंदविल्या आहेत.<br>**उच्चस्तरीय समितीने खालीलप्रमाणे निरिक्षणे नोंदविले आहेत.**<br>१. सदर गोपनीय प्रेस ही आपल्या कामामध्ये सक्षम व अनुभवी नसल्याचे दिसून येते.<br>२. यापैकी बऱ्याचशा चुकांची पुनरावृत्ती झाल्याचे दिसून येते.<br>३. कोणत्याही प्रश्नपत्रिकेचे योग्य मुद्रीतशोधन झालेले नाही.<br>४. विद्यापीठाच्या मार्गदर्शक सुचनानुसार टंकलेखन व मुद्रीतशोधनाचे काम व्यवथित झाल्याचे आढळून येत नाही.<br>५. नियोजित वेळापत्रकानुसार प्रश्नपत्रिकेचे वितरण विहीत वेळेत झाल्याचे दिसून येत नाही.<br>६. विद्यापीठाने दिलेल्या प्रश्नपत्रिका व गोपनीय प्रेसनी वितरीत केलेल्या प्रश्नपत्रिकेमध्ये खूप तफावत असल्याचे दिसून येते.<br>७. बऱ्याच प्रश्नपत्रिकांमध्ये शीर्षक व विषयाचे नाव नसणे, एकूण गुणांमध्ये फरक असणे, दिनांक चुकीचा असणे, SLR क्रमांक चुकीचा छापणे, अभ्यासक्रम चुकीचा छापणे, वेळेत बदल असणे, सेमिस्टर चुकीचा छापणे, झालेल्या प्रश्नपत्रिका पुनःश्च वितरीत करणे, एका प्रश्नपत्रिकेवर वेगवेगळा SLR छापणे, चुकीचे शीर्षक छापणे, अशाप्रकारच्या अनेक चुका आढळून आलेल्या आहेत. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |

| | | |
|---|---|---|
| | तसेच वरीलप्रमाणे निरीक्षणांच्या अनुषंगाने उच्चस्तरीय समिती खालीलप्रमाणे ठराव केला आहे.<br>वरील सर्व चुका गंभीर व अक्षम्य असल्यामुळे विद्यापीठाची प्रतिमा नाहक मलिन झाली आहे. याकारणाने व विद्यापीठाशी संबंधित सर्व घटकांना याचा त्रास सहन करावा लागल्यामुळे ही समिती संबंधित गोपनिय प्रेस यांच्यावर विद्यापीठ नियमानुसार व संबंधित गोपनीय प्रेसच्या करारनाम्यानुसार उचित कारवाई करण्याची शिफारस सर्वानुमते करीत आहे.<br>सबब, सदर उच्चस्तरीय समितीने उपलब्ध प्रश्नपत्रिका व त्यानुषंगी कागदपत्रांचा अभ्यास करुन त्याचा सविस्तर तपशिल व अहवाल सोबत जोडला आहे व तो पुढील कार्यवाहीसाठी मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्याकडे सादर केला आहे. सदर अहवाल व शिफारशी विचारात घेता संबंधित गोपनीय फर्मच्या संदर्भात व मार्च २०२५ च्या परीक्षेसंदर्भात काय कार्यवाही करावी याबाबत सदरचा विषय मा. व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यास मा. कुलगुरु महोदय यांनी मान्यता दिली आहे.<br>तथापि, ऑक्टो/नोव्हे २०२४ च्या परीक्षेमध्ये गोपनीय प्रेसच्या माध्यमातून प्रश्नपत्रिकांमध्ये झालेल्या चुकांच्या अनुषंगाने विद्यार्थी संघटना, महाविद्यालयाचे प्राचार्य, अधिसभा सदस्य व इतर विविध संघटना यांच्या प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदय यांनी नामनिर्देशित नियुक्त उच्चस्तरीय समितीचा प्राप्त अहवाल विचारार्थ. | |
| ठराव : | **सदरचा विषय करारपत्र व अहवालासह पुढील बैठकीत सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना आणि विद्यापीठ परिसर संकुलांनी विशेष व्याख्यान/चर्चासत्र/कार्यशाळा/परिषद वित्तीय सहाय्य करणेसंदर्भात शिफारस मा.कुलगुरु महोदय यांनी गठीत केलेल्या समितीची बैठक दि.२७/०२/२०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर गठीत समितीने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातंर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सर्व संलग्नित महाविद्यालये व संकुलाकडून आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय/राज्य/विद्यापीठस्तरीय/ विशेष व्याख्या, कार्यशाळा, चर्चासत्र, परिषद आयोजनाकरिता प्रस्ताव मागविण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने नियमावली तयार करणे आवश्यक होती. मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेनुसार समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीची दि.२७/०२/२०२५ रोजी बैठक सकाळी ११:०० आयोजित करण्यात आली होती. गठीत समितीने विशेष व्याख्यान, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, विद्यापीठस्तरीय, कार्यशाळा, चर्चासत्र, परिषद याकरिता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन आणि महात्मा बसवेश्वर अध्यासन दोन्ही अध्यासनास एकच नियमावली तयार करण्याबाबत सर्वानुमते ठरले.<br>त्याअनुषंगाने विशेष व्याख्यान/चर्चासत्र/कार्यशाळा/परिषद घेण्याबाबतची वित्तीय सहाय्यतून करावयाचे कार्य, याबाबत सविस्तर नियमावली तयार केली आहे. सदर नियमावली ही महात्मा बसवेश्वर अध्यासन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन यांना लागू राहील. समितीने केलेली नियमावली विचारार्थ. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र<br>महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र |
| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना आणि विद्यापीठ परिसर संकुलांनी विशेष व्याख्यान/चर्चासत्र/कार्यशाळा/परिषद वित्तीय सहाय्य करणेसंदर्भात शिफारस करणेकरीता मा. कुलगुरु महोदय यांनी गठीत केलेल्या समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०४ ] | **प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना आणि विद्यापीठ परिसर संकुलांनी संशोधन प्रकल्प नियमावली व वित्तीय सहाय्यता याबाबत सविस्तर निकष व नियमावली तयार करण्याबाबत शिफारस करणेकरिता मा.कुलगुरु महोदय यांनी गठीत केलेल्या समितीची बैठक दि.०७/०३/२०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर गठीत समितीने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातंर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सर्व संलग्नित महाविद्यालये व संकुलाकडून संशोधन प्रकल्प तयार करण्याबाबत वित्तीय सहाय्यता नियमावली व निकष तयार करणे आवश्यक होती. मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेनुसार समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीची दि.०७/०३/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. गठीत समितीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन व महात्मा बसवेश्वर अध्यासन दोन्ही अध्यासनास एकच नियमावली तयार करण्याबाबत सर्वानुमते ठरले.<br>त्याअनुषंगाने याबाबत सविस्तर नियमावली तयार केली आहे. सदर नियमावली ही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन व महात्मा बसवेश्वर अध्यासन यांना लागू राहील. समितीने केलेली नियमावली विचारार्थ. | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र<br>महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र |
| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना आणि विद्यापीठ परिसर संकुलांनी संशोधन प्रकल्प नियमावली व वित्तीय सहाय्यता याबाबत सविस्तर निकष व नियमावली तयार करण्याबाबत शिफारस करणेकरिता मा.कुलगुरु महोदय यांनी गठीत केलेल्या समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०५ ] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स (MACCIA-INNOeVERSITY) यांच्यामध्ये दि.२५ जुलै, २०२४ रोजी सामंजस्य करार झालेला आहे. सदर सामंजस्य कराराचा एक भाग म्हणून MACCIA-INNOeVERSITY यांच्यामार्फत विद्यापीठ संकुले व संलग्नित महाविद्यालयामध्ये ऑन जॉब ट्रेनिंग (OJT) कार्यक्रम कार्यान्वित करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स (MACCIA-INNOeVERSITY) यांच्यामध्ये दि.२५ जुलै, २०२४ रोजी सामंजस्य करार झालेला आहे. दि.०५ जून २०२४ रोजी विद्यापीठ सभागृहामध्ये आंतरवासिता (OJT) संदर्भात एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेकरिता संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य, संकुलाचे संचालक, TPO व महाविद्यालयातील IQAC समन्वयक उपस्थित होते. तसेच सामंजस्य कराराचा एक भाग म्हणून दि.०१/०३/२०२५ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ०५:०० या वेळेत सोलापूर विद्यापीठ सभागृहात "Bussiness Solution Polyclinic & Faculty Capacity Building Program" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेमध्ये व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व विविध कंपन्यामधील नामवंत तज्ञ मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळा विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य, TPO, इंटर्नशिप सेलचे समन्वयक तसेच प्रस्तुत विद्यापीठातील सर्व नियमित व कंत्राटी शिक्षक यांच्यासाठी आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळा सहभागी शिक्षकांना उद्योगातील अंतदृष्टी मार्गदर्शन संधी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांची रोजगार क्षमता वाढविण्यासाठी ऑन जॉब ट्रेनिंग (OJT) मॉडेल सक्षम करण्यासाठी माहिती दिली. सदर कार्यशाळा Industry-Institute Intraction मजबूत करण्यासाठी सुसंगत होती. सदर कार्यशाळेच्या सकारात्मक अभिप्रायाच्या आधारावर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स (MACCIA-INNOeVERSITY) यांच्याकडून MACCIA-INNOeVERSITY यांच्यामार्फत विद्यापीठ संकुले व संलग्नित महाविद्यालयामध्ये करिता मदत करण्याचे त्यांनी मान्य केले आहे. सदर कार्यशाळेत प्रत्येक पात्र सहभागी संस्थामधून पहिल्या १० पात्र UG आणि PG विद्यार्थ्यांना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स (MACCIA-INNOeVERSITY) यांनी १२० तासांच्या ऑन जॉब ट्रेनिंग (OJT) त्यांनी प्रस्तावित केले | प्लेसमेंट सेल |

| | |
|---|---|
| | आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना ऑन जॉब ट्रेनिंग किंवा इंटर्नशिप अनिवार्य आहे. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना उदयोग अनुभव मिळण्याची व आवश्यक कौशल्य विकसित करण्याची अनोखी संधी मिळणार आहे. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना फायदा होईलच शिवाय त्यांची रोजगार क्षमता वाढेल. MACCIA-INNOeVERSITY यांच्यामार्फत विद्यापीठ संकुले व संलग्नित महाविद्यालयामध्ये ऑन जॉब ट्रेनिंग (OJT) कार्यक्रम कार्यान्वित करण्यासाठी पाठविलेला विनंती ई-मेल जोडलेला आहे.<br><br>सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स (MACCIA-INNOeVERSITY) यांच्यामध्ये दि.२५ जुलै, २०२४ रोजी सामंजस्य करार झालेला आहे. सदर सामंजस्य कराराचा एक भाग म्हणून MACCIA-INNOeVERSITY यांच्यामार्फत विद्यापीठ संकुले व संलग्नित महाविद्यालयामध्ये ऑन जॉब ट्रेनिंग (OJT) कार्यक्रम कार्यान्वित करण्याची बाब विचारार्थ. |
| ठराव : | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स (MACCIA-INNOeVERSITY) यांच्यामध्ये दि.२५ जुलै, २०२४ रोजी झालेल्या सामंजस्य कराराचा एक भाग म्हणून MACCIA-INNOeVERSITY यांच्यामार्फत विद्यापीठ संकुले व संलग्नित महाविद्यालयामध्ये ऑन जॉब ट्रेनिंग (OJT) कार्यक्रम कार्यान्वित करण्यास तत्वत: सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तथापि, फीच्या संदर्भात रु.३५००/- च्या ऐवजी वाटाघाटी करुन कमीतकमी फी निश्चित करण्यात यावी असे ठरले.** |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०६ ] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व बजाज फायनान्स लि. यांच्यामध्ये होणाऱ्या सामंजस्य कराराचा मसुदा विचारार्थ.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व बजाज फायनान्स लि. पुणे यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्याकरिता मसुदा MoU कक्षाकडे तपासणीकरिता दि.०५/११/२०२४ रोजी पाठविला होता. MoU सेलच्या दि.२७/११/२०२४ बैठकीमध्ये MoU सेलने सुचविलेल्या दुरुस्त्या करुन दि.२३/०१/२०२५ रोजी MoU सेलला पाठविला. सदर सामंजस्य करार मसुदा दि.२३/०१/२०२५ रोजीच्या MoU सेलच्या बैठकीमध्ये ठेवला होता. त्यामध्ये त्यांनी दुरुस्त्यासह MoU अंतिम करण्याबाबतची कार्यवाही संबंधित विभागाने करावी असे कळविले आहे. MoU सेलने सुचवलेल्या दुरुस्त्या सामंजस्य कराराच्या मसुदयामध्ये समाविष्ट केल्या आहेत. या सामंजस्य कराराच्या अंतर्गत विद्यापीठ संकुलातील व संलग्नित महाविद्यालयामध्ये M.B.A., M. Com., M.A. Economics या विषयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देणे तसेच लहान शहरे व ग्रामीण भागातील पदवीधरांना सक्षम बनविणे व सेवा उदयोगातील करिअरसाठी योग्य बनविणे. संवाद कौशल्य विकसित करणे आणि रिटेल बँकिंग, NBFC, जीवन विमा आणि सामान्य विमा मधील उत्पादने आणि प्रक्रियाबध्दल व्यवहारिक ज्ञान मिळविणे विद्यार्थ्यांना सोयिस्कर होईल. प्रचलित पध्दतीनुसार सदरचा सामंजस्य कराराचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये ठेवून मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुढील प्रक्रिया करण्यात येते.<br>सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व बजाज फायनान्स लि. यांच्यामध्ये होणाऱ्या सामंजस्य कराराचा मसुदा विचारार्थ. | प्लेसमेंट सेल |
| ठराव : | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व बजाज फायनान्स लि. यांच्यामध्ये होणाऱ्या सामंजस्य कराराच्या मसूद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ ] | **प्रस्तुत विद्यापीठातील मुलांच्या व मुलींच्या वसतीगृहाकडील दोन्ही मेस सुरळीत चालविण्यासाठी सुरक्षा ठेव रु.५०,०००/- व इमारत भाडे प्रती महिना रु.२,५००/- इतके करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातील मुलांच्या व मुलींच्या वसतीगृहातील मेस चालविण्याकरिता दरवेळी टेंडर प्रक्रीया करुन देण्यात येते. मुलांच्या व मुलींच्या वसतीगृहाकडील प्रती मेस करीता सुरक्षा ठेव रु.२,००,०००/- व मेस चालविण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या इमारत भाडेपोटी प्रती महिना रु.८,०००/- इतके इमारत भाडे घेतले जाते. परंतु विद्यापीठातील मुलांच्या व मुलींच्या वसतीगृहातील विद्यार्थी संख्या पुरेसी नसल्याने, तसेच सुरक्षा ठेव रु.२,००,०००/- इतकी जादा असल्याने व इमारत भाडे प्रती महिना रु.८,०००/- इतके असल्याने न्युनत्तम दर ठरलेले मक्तेदार गेल्या दोन वर्षापासून मेस चालवू शकत नाहीत असे निदर्शनास आले आहे.<br>त्यामुळे मुलांच्या व मुलींच्या वसतीगृहाकडील दोन्ही मेस सुरळीत चालविण्यासाठी यावर्षीपासून सुरक्षा ठेव रु.५०,०००/- व इमारत भाडे प्रती महिना रु.२,५००/- इतके करण्यास मा. कुलगुरु महोदय यांनी मान्यता दिली आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठातील मुलांच्या व मुलींच्या वसतीगृहाकडील दोन्हीं मेस सुरळीत चालविण्यासाठी सुरक्षा ठेव रु.५०,०००/- व इमारत भाडे प्रती महिना रु.२,५००/- इतके करण्याची बाब विचारार्थ. | वसतिगृह विभाग |
| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठातील मुलांच्या व मुलींच्या वसतीगृहाकडील दोन्ही मेस सुरळीत चालविण्यासाठी सुरक्षा ठेव रु.५०,०००/- व इमारत भाडे प्रती महिना रु.८,०००/- इतके करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०८ ] | **प्रस्तुत विद्यापीठात कौशल्य विकास केंद्र अंतर्गत विविध कौशल्याधारित एकुण १४३ प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रस्तावित आहेत. तसेच नोंदणीकृत महाविद्यालये/ संस्थाकडून नवीन विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावांकरिता प्रस्ताव शुल्क (प्रति प्रस्ताव) ₹१,०००/- आकारण्याची बाब व त्याकरिता कौशल्य विकास केंद्राचे स्वतंत्र अंदाजपत्रकीय शिर्षक तयार करण्याकरिता अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात कौशल्य विकास केंद्र अंतर्गत विविध कौशल्याधारित एकुण १४३ प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रस्तावित आहेत. तसेच नवीन विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यासाठीचे प्रस्ताव नोंदणीकृत महाविद्यालये / संस्थाकडून तसेच गतवर्षीच्या महाविद्यालये / संस्थांच्या मान्यतेचे नुतनीकरणासाठीचे प्रस्ताव दरवर्षी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करून जाहिर निवेदनाद्वारे प्रस्ताव मागविले जातात.<br>सदर जाहिरातीस अनुसरुन प्राप्त प्रस्तावांचे पारंपारिक व परावैद्यकीय याप्रमाणे वर्गीकरण करणे, प्रस्तावांची अनुषंगिक मान्यता घेणे व तद्नंतर छाननी समितीकडुन कागदपत्रे पडताळणी करुन घेणे व छाननी समिती अहवालानुसार महाविद्यालये / संस्थांकडून त्रुटींची पुर्तता करुन घेवून, स्थानिक चौकशी समिती कडून प्रत्यक्ष स्थळ भेट देवून अहवाल सादर करणे व समिती अहवालानुसार सर्व प्रस्ताव विद्यापरिषदेसमोर मान्यतेस्तव सादर करणे इ. कार्यवाही करण्यासाठी संबंधित संस्था/महाविद्यालय यांच्या कडुन प्रशासकीय प्रक्रिया शुल्क (प्रति प्रस्ताव) ₹१,०००/- इतके घेण्यास दि.२०/०२/२०२४ रोजीच्या टिपणीअन्वये मा. कुलगुरु महोदयांची मान्यता घेण्यात आलेली आहे. परंतु सदर बाबीस प्राधिकरण व शुल्क समितीची मान्यता असणे गरजेचे आहे.<br>शै. वर्ष २०२४-२५ करिता मागविण्यात आलेल्या प्रस्तावावरील प्रक्रिया शुल्क हे कौशल्य विकास केंद्राच्या संलग्निकरण शुल्क या अंदाजपत्रकीय शिर्षका अंतर्गत जमा करण्यात आले, परंतु शै. वर्ष २०२५-२६ करिता मागविण्यात येणाऱ्या प्रस्तावावरील प्रक्रिया शुल्क हे कौशल्य विकास केंद्राच्या स्वतंत्र अंदाजपत्रकीय शिर्षका खाली जमा करणे गरजेचे आहे व त्यासाठी स्वतंत्र अंदाजपत्रकीय शिर्षक तयार करुन घेणे आवश्यक आहे. | कौशल्य विकास केंद्र |

| | | |
|---|---|---|
| | सबब, प्रस्तुत विद्यापीठात कौशल्य विकास केंद्र अंतर्गत विविध कौशल्याधारित एकुण १४३ प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रस्तावित आहेत. तसेच नोंदणीकृत महाविद्यालये / संस्थाकडून नवीन विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावांकरिता प्रस्ताव शुल्क (प्रति प्रस्ताव) ₹१,०००/- आकारण्याची बाब व त्याकरिता कौशल्य विकास केंद्राचे स्वतंत्र अंदाजपत्रकीय शिर्षक तयार करण्याकरिता अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ. | |
| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठात कौशल्य विकास केंद्र अंतर्गत विविध कौशल्याधारित एकुण १४३ प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रस्तावित आहेत. तसेच नोंदणीकृत महाविद्यालये/ संस्थाकडून नवीन विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावांकरिता प्रस्ताव शुल्क (प्रति प्रस्ताव) ₹१,०००/- आकारण्याची बाब व त्याकरिता कौशल्य विकास केंद्राचे स्वतंत्र अंदाजपत्रकीय शिर्षक तयार करण्याकरिता अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०९ ] | **प्रस्तुत विद्यापीठास दर महाप्राप्त होणारी विज बिल, पाणी बिल, पोस्ट पेड फोन बिलावर Allotment व Accession रजिस्टर मध्ये नोंद घेवून विभागप्रमुख यांच्या स्वाक्षरीने सदर देयके थेट वित्त व लेखा विभागास पाठवून कार्यवाही करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या वापरात असलेल्या ३३०३९९०५००१० या क्रमांकाचे मा. कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे नावे दर महा अंदाजे सरासरी ३,५०,०००/- ते ४,००,०००/- इतकी रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या यांना अदा करावी लागते. तसेच सोलापूर महानगर पालीका, सोलापूर यांना दर महा पाणी पुरवठा बिल रु.१३,६०८/- इतके भरणा करावे लागते. विद्युत पुरवठ्याचे देयक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांच्या संकेतस्थळावरून दर महा डाऊनलोड करणे आवश्यक असते. सदर देयक अदा करण्यास विलंब शुल्काचा निश्चित कालावधी नमुद केलेला असल्याने त्या विलंब दिनांकापुर्वी सदर विज देयक अदा होणे आवश्यक असते. सदर विद्युत देयकास दर महा सहा. कुलसचिव, विद्यापीठ अभियंता, मा. वित्त व लेखाधिकारी, मा.कुलसचिव, मा.प्र कुलगुरु, मा.कुलगुरु या अधिकाऱ्यांची प्रशासकीय मान्यतेच्या टिपणीवर स्वाक्षरी झाल्यानतंर सदर विद्युत देयक वित्त व लेखा विभागास सादर करण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष देयक अदा होण्याची कार्यवाही होते. दर महा सहा.कुलसचिव, विद्यापीठ अभियंता, मा. वित्त व लेखाधिकारी, मा.कुलसचिव, मा.प्र कुलगुरु, मा.कुलगुरु संविधानीक अधिकारी बऱ्याच वेळा विविध बैठकामध्ये व्यस्थ असतात अथवा विविध बैठकीसाठी बऱ्याच वेळा पुणे, मुंबई इ. बाहेरगावी असतात त्यामुळे वेळेत प्रशासकीय मान्यते अंती मुदतीत देयक वित्त व लेखा विभागास पाठविणे अशक्य होते तथापी, वेळेत प्रशासकीय कार्यवाही पुर्ण करणे अंत्यत जिकिरीचे होते. परीणामी विद्यापीठास विलंबशुल्क भरणा करावा लागू शकतो. तसेच बऱ्याच वेळा कार्यालयाची संपुर्ण प्रशासकीय कार्यवाही पुर्ण होण्यास / प्रशासकीय मान्यता मिळण्यास शासकीय सुट्यामुळे अथवा प्रशासकीय अधिकारी कार्यालयीन कामकाजत व्यस्थ असल्यामुळे विलंब होवू शकणार आहे.<br>प्रस्तुत विद्यापीठास दर महा प्राप्त होणारे विज बिल, पाणी बिल, फोन बिल वेळेवर/मुदतीत/ विना विलंब अदा करावी लागणाऱ्या देयकावर Allotment व Accession रजिस्टर मध्ये नोंद घेवून थेट वित्त व लेखा विभागास पाठविल्यास विद्यापीठास सदर देयकापोटी विलंब शुल्कापोटी जादा रक्कम भरावी लागणार नाही. त्यामुळे दर महा प्राप्त होणारी देयके विना विलंब अदा होतील व त्यामुळे विद्यापीठाची आर्थिक बचत होणार आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठास दर महाप्राप्त होणारी विज बिल, पाणी बिल, पोस्ट पेड फोन बिलावर Allotment व Accession रजिस्टर मध्ये नोंद घेवून विभागप्रमुख यांच्या स्वाक्षरीने सदर देयके थेट वित्त व लेखा विभागास पाठवून कार्यवाही करण्याची विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| <u>ठराव :</u> | **सदरचा विषय सर्वानुमते मागे घेण्यात आला.** | |

मा.कुलगुरु तथा अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १० (१) ] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव उत्सव विद्यापीठ आणि विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्याल्यांमध्ये साजरा करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्या रथाचे मिरवणूक वेळीस अहिल्याप्रेमी व काही दानशूर व्यक्तींकडून देणगी ऑफलाईन व ऑनलाईन पध्दतीने स्वीकरण्याकरिता देणगी पावती छापण्याचीबाब विचारार्थ.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सव उत्सव विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये साजरा करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्या रथ तयार करण्याच्या अनुषंगाने गठीत समितीचे दूसरी बैठक दि. २८/०२/२०२५ रोजी संपन्न झाली आहे. सदर बैठकीमध्ये अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यावर आधारित चित्ररथाबाबत चर्चा करण्यात आली असून मिरणूकीचे मार्ग व वेळ निश्चित करण्यात आले आहे. तसेच गठीत समितीचे सदर बैठकीमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सव विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये साजरा करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्या रथाचे मिरवणूक वेळीस अहिल्याप्रेमी व काही दानशूर व्यक्तींकडून देणगी ऑफलाईन व ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्याकरिता देणगी पावती देणे आवश्यक आहे, देणगी पावती छापण्याबाबत मा. व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्याचे सर्वानुमते ठरले.<br>सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव उत्सव विद्यापीठ आणि विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये साजरा करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्या रथाचे मिरवणूकी वेळीस अहिल्याप्रेमी व काही दानशूर व्यक्तींकडून देणगी ऑफलाईन व ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्याकरिता देणगी पावती छापण्याची बाब विचारार्थ. | क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग |
| ठराव : | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती महोत्सव उत्सव विद्यापीठ आणि विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये साजरा करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्या रथाचे मिरवणूक वेळीस अहिल्याप्रेमी व काही दानशूर व्यक्तींकडून देणगी रोख स्वरुपात न घेता केवळ धनादेश, विद्यापीठ खात्यावर ट्रांसफर, ऑनलाईन पध्दतीने व वस्तुंच्या स्वरुपात स्वीकरण्यास व त्यांना विद्यापीठाकडील पावती देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच स्वतंत्र देणगी पावती छपाई करुन घेऊ नये असेही सर्वानुमते ठरले.** | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद